

Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक १२वा, मुंबई । फेब्रुवारी २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 12, Mumbai I February 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## ।। ॐ नमः शिवाय ।।



महाशिवरात्रीच्या
सर्व ज्ञाती बांधव-भगिनींना, सभासदांना, देणगीदार, जाहिरातदारांना
हार्दिक शुभेच्छा!




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक १२वा,
फेब्रुवारी २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in








**बी बी एन जी परिवर्तन उद्योजक महामेळाव्यात श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित**



**श्री. अतुल खिरवाडकर C.E.O., National Urban Co-operative Finance and Development Corporation Limited. NUCFDC, New Delhi यांची मध्यवर्ती मंडळाच्या कार्यालयास भेट. सोबत अर्थतज्ञ श्री. उदय तारदाळकर**


MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days
Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb
Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days
Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days
Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from
Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

**Ravindra Deshpande**

REC

# RASHMI ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

# ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल

## प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष)

जजी संस्था ब्राह्मण समाजामध्ये उद्योजकता निर्माण व्हावी समाजात अधिक-अधिक उद्योजक निर्माण व्हावे व त्यांचा व्यवसाय वाढावा या दृष्टीने नाशिकचे उद्योजक श्री. श्रीपाद कुलकर्णी, आपले आधारस्तंभ आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ नाशिक या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक श्री. मुंकुदराव कुलकर्णी व इतरांनी स्थापन केलेल्या बी. बी. एन. जी म्हणजेच ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल या संस्थेच्या ९व्या ''परिवर्तन'' या परिषदेला उपस्थित राहण्याची संधी मला व आपले कार्यवाह मिलिंद सरदेशमुख यांना प्राप्त झाली होती. सांगायला आनंद वाटतो की या परिषदेला बाराशेच्यावर लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योजकांनी उपस्थिती लावली होती. महाराष्ट्रातील उद्योगनगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे ही परिषद दि. ०२/०२/२०२५ रोजी संपन्न झाली. नुकत्याच दावोस येथे संपन्न झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये आपले लाडके मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ९ लाख कोटींच्यावर गुंतवणूकीचे करार केले आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगरचा वाटा ६५ टक्केच्या वर आहे. याचाच अर्थ अंदाजे ६ लाख कोटींच्यावर गुंतवणूक पुढील काही वर्षात उद्योगांमध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये गुंतवली जाणार आहे. अनेक मोठे प्रकल्प या शहरात पुढील काही वर्षात सुरू होणार आहेत आणि अनेक कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन रोजगारात भव्य वाढ होणार आहे. कदाचित यावरील औद्योगिक विकासाचा विचार करून आयोजकांनी छत्रपती संभाजीनगर येथे ही परिषद यशस्वी करण्याचा संकल्प केला असेल त्याबद्दल ब्राह्मण समाजातील सर्व आयोजकांचे, उद्योजकांचे आणि व्यवसायिकांचे मनपूर्वक: अभिनंदन आणि आभार. या परिषदेमध्ये दरम्यान B2B आणि B2C असे अनेक ब्राह्मण उद्योजकांचा एकमेंकाशी संपर्क घडविण्याचे आणि त्यांचामध्ये उद्योग वृद्धीचे करार घडवून आणण्याचे महत्त्वाचे काम या परिषदेमध्ये संपन्न झाले. ३००च्यावर करारन्वये अंदाजे ५० कोटींच्यावर उद्योगधंद्याचे करार या परिषदेमध्ये पार पाडले. त्याबद्दल सर्व उद्योजकांचे आणि आयोजकांचे मनपूर्वक अभिनंदन. या परिषदेन्वये सोशल प्लॅटफार्मचा उपयोग करून नेटवर्क प्रणालीव्दारे ब्राह्मण उद्योजकांनी एकमेकांना समर्थ व संपन्न करण्यास मदत करावी हा आयोजकांचा उद्देश निश्चितपणे सफल झाला आहे. असा माझा ठाम विश्वास आहे. ''**एकमेकां करू साहाय्य, अवघे धरू सुपंथ**''.

विशेषत: अनेक स्वयंसेवकांच्या मेहनतीने एकूणच आयोजन, भोजनाची, व्यवस्था, आगत-स्वागत हे सर्व उत्कृष्ट पार पडल्याबाबत परिषदेच्या सर्व स्वयंसेवकांचे मनपूर्वक: अभिनंदन.विशेष नमूद करावे असे वाटते की या परिषदेला प्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. उदय निरगुडकर यांनी ए. आय (Artificial Intelligence) ''कृत्रिम बुद्धीमत्ता'' या विषयावर ज्वलंत उदाहरणे घेऊन, तंज्ञाव्दारे मार्गदर्शन केले कारण पुढील सर्व तंत्रज्ञान डिजिटल व्यवस्थेनुसार चालणार असून कृत्रिम बुद्धीमतेचा त्यात सिंहाचा वाटा असेल. त्यामुळे सर्व सामान्यांना ''कृत्रिम बुद्धीमत्ता'' या विषायावर ज्ञान देणे मोलाचे होते. तसेच प्रसिद्ध पत्रकार आणि ॲनालायजर या युट्यूबचे प्रणेते श्री. सुशिल कुलकर्णी यांनी सध्या प्रचलित असलेल्या ''अमृत'' आणि ''परशुराम'' आर्थिक विकास महामंडळाव्दारे महाराष्ट्र शासनाने निर्माण केलल्या ब्राह्मण समाजासाठीच्या आर्थिकविकास आणि साहाय्यच्या योजना संबंधी आणि त्यातील त्रुटीसंबंधी तज्ञाकडून माहिती उपस्थितांना करून दिली जेणेकरून या शासकीय योजनांचा लाभ समाजातील लोकांना योग्यप्रकारे व्हावे त्यांच्या आर्थिक विकास व्हावा. परिषदे दरम्यान नव उद्योजकांनी त्यांच्या उत्पादनाची माहिती उपस्थितांना करून दिली व त्यांच्या उद्योग व्यवसाय यांचा प्रसार व्हावा यादृष्टीने उपस्थिताना अवगत केले. सांगण्याचा आनंद वाटतो की प्रसिद्ध उद्योजिका सौ. सुप्रिया बडवे ज्या बडवे इंजिनिअरींग या प्रसिद्ध कंपनीच्या डायरेक्टर आहेत,

श्री. राम भोगले, रूद्रानी इनफ्रा स्ट्रक्चरचे श्री. विवेक देशपांडे, प्रसिद्ध डॉ. विजय जोशी सिडनी, प्रसिद्ध रस्तेतज्ञ, श्री निलेश दिक्षित मॅनेजिंग डायरेक्टर रेनमॅक हे उपस्थित होते व त्यांनी परिषदेला मार्गदर्शक केले. खास नमूद करावेसे वाटते की श्री. निलेश दिक्षित तरुण उद्योजक असून ते मेट्रोरेल, लोकल आणि इतर रेल्वेसाठी अद्यावत सुरक्षा पुरवतात. व त्यांना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्याचा अभिमान आहे. या परिषदेमध्ये अनेक उद्योजकांना उद्यम कौस्तुभ आणि जीवनगौरव या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ब्राह्मण समाज नुसाता सुखी न राहता तो समर्थ व संपन्न व्हावा तसेच त्यांच्यामध्ये उद्योजकतेची वाढ व्हावी यासाठी बी. बी. एन. जी ने केलेल्या प्रयत्नास सलाम.

सर्व ब्राह्मण समाज संस्थाला मी आव्हान करतो की, भारत देशातील सर्व ब्राह्मण संस्थानी बी. बी. एन. जी सारख्या स्वयंमसेवी ब्राह्मण उद्योजक संस्थाची साह्य करून ''आत्मनिर्भर भारत'' निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे, व जे स्वप्न आपले लाडके प्रंतपधान श्री. नरेंद्र मोदी यांनी समस्त एकशे चाळीस कोटी भारतीयांतर्फे साकार करण्याच्या निर्धार केला आहे त्यामध्ये ब्राह्मण समाजाचा सहभाग असावा ही श्री प्रभू रामचरणी प्रार्थना.

## नुपेक्षी कदा राम दासाभिमानी - ९

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे। कृपाळुपणे अल्प धारीष्ट पाहे।।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३६।।**

श्रीमद भगवद्गीतेतील पुढील श्लोक हे स्पष्ट करतो परमेश्वर सर्वत्र आहे. तो श्लोक असा :

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।।**

(भगवद्गीता - अध्याय १३, श्लोक १४)

तो (परमेश्वर) सर्वत्र हात आणि पाय असलेला आहे, सर्वत्र डोळे, डोके आणि तोंड असलेला आहे. तो सर्वत्र कान असलेला आहे आणि तो या संपूर्ण विश्वात व्याप्त आहे. या श्लोकात श्रीकृष्ण स्पष्ट सांगतात की परमेश्वर केवळ एका ठिकाणी नसून तो सर्वत्र आहे. तो प्रत्येकाच्या हृदयात वास करतो, प्रत्येक वस्तू, प्राणी आणि संपूर्ण सृष्टीत त्याचा अंश आहे. त्यामुळेच भक्ताने कुठेही असो, कोणत्याही परिस्थितीत असो, परमेश्वराची कृपा त्याच्यावर राहते. परमेश्वर हा अज्ञानाच्या पडद्याआड लपलेला नसून तो आपल्या अंतरात्म्यात आहे; फक्त श्रद्धेने आणि भक्तीने त्याला जाणण्याची आवश्यकता आहे.

खरोखरच परमेश्वर हा सर्वव्यापी आहे. तो कधीच कुणाला सोडून जात नाही. आपण जेव्हा जीवनात एकटे असल्याची भावना करतो, तेव्हा प्रत्यक्षात तोच आपल्याला मार्ग दाखवत असतो. त्याची सोबत ही केवळ संकटांच्या वेळी नसते, तर सुखाच्या क्षणांतही तो आपल्या सोबत असतो. आपण त्याच्यावर श्रद्धा ठेवली, त्याला हृदयातून हाक मारली, तर तो नक्कीच उत्तर देतो. अनेक वेळा आपणच आपले चित्त संसाराच्या गडबडीत गुंतवून घेतो आणि परमेश्वराची सोबत विसरतो. पण जशी वाऱ्याने हालणाऱ्या झाडाची सावली तशीच राहते, तशीच परमेश्वराची कृपाही असते. तो कधीही सोडून जात नाही, फक्त आपण त्याला ओळखायचं विसरतो. संकटे आली तरी तोच आधार देतो, मार्ग दाखवतो, आणि योग्य वेळी योग्य गोष्टी घडवून आणतो. म्हणूनच, भक्तांनी मनात कोणताही संशय न ठेवता त्याच्यावर श्रद्धा ठेवावी, कारण तोच आपला खरा आधार आहे.

परमेश्वर हा केवळ दयाळू नाही, तर न्यायीही आहे. तो आपल्या भक्तांना केवळ सुख देत नाही, तर त्यांची परीक्षा घेऊन त्यांना अधिक शुद्ध आणि सामर्थ्यवान बनवतो. ही परीक्षा म्हणजे शिक्षेचा प्रकार नाही, तर आत्मविकासाचा एक मार्ग आहे. जसा सोनं तापवल्याशिवाय शुद्ध होत नाही, तसाच मानवही कठीण

प्रसंगांमधून अधिक सक्षम होतो. परमेश्वराला आपल्याला चिरंतन आनंद आणि मोक्ष द्यायचा आहे, पण त्यासाठी आपली पात्रता वाढायला हवी. म्हणूनच तो संकटाच्या, अडचणींच्या माध्यमातून आपल्याला शिकवतो. या परीक्षा आपल्याला कधी अशक्य वाटतात, पण त्या सोडवायची शक्तीही तोच आपल्याला देतो. ज्या भक्तांनी हे समजून घेतलं, त्यांनी परमेश्वरावर अधिक श्रद्धा ठेवली. कारण त्याच्या परीक्षा आपल्या अपयशासाठी नसतात, तर आपली खरी क्षमता समजून घेण्यासाठी असतात.

परमेश्वर हा केवळ स्वामी नाही, तर भक्तांच्या सेवेत असणारा आहे. तो आपल्या दासांचा अभिमान बाळगतो. जो त्याला संपूर्ण शरण जातो, त्याचा तो संपूर्ण भार उचलतो. त्याला केवळ आपली प्रार्थना, पूजा आणि भक्ती नकोय, तर पूर्ण समर्पण हवंय. जो त्याच्या चरणी नतमस्तक होतो, त्याला तो सुखानंद देतो. भौतिक जगातील सुखं तात्पुरती असतात, पण परमेश्वर जे सुख देतो, ते अनंत असतं. त्याच्याशी एकरूप झाल्यावर माणसाला कैवल्य, म्हणजेच खऱ्या अर्थाने मुक्ती मिळते. म्हणूनच, त्याच्यावर श्रद्धा ठेवून, समर्पित भावनेने जीवन जगलं तर, तोच आपल्याला खरी शांती, आनंद आणि मोक्ष प्रदान करतो.

## संलग्न संस्था वृत्त

**मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंडने एक आगळा वेगळा कार्यक्रम 'शूरा मी वंदिले' शनिवार दिनांक ११-१-२०२५ रोजी संस्थेच्या सभागृहात आयोजित केला होता श्री मधूसुदन सुर्वे यांनी दहशतवाद्यांशी लढतानाचे चित्त थरारक अनुभव कथन केले. श्री मधुसुदन सुर्वे यांचीओळख अतिशय सुंदर प्रकारे करून देत सौ अरुणा अग्निहोत्री यांनी सूत्रसंचालन केले. आपले घराणे म्हणजे त्यांचे पणजोबा, आजोबा व वडील


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* — *@jvmarketing18* — *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

मिलिटरी मध्ये होते आता पुढची पिढी पण या क्षेत्रात येण्यासाठी परीक्षा देत आहे असे सांगितले. मी देशासाठी थोडेसे लढण्याचा प्रयत्न केला असे विनम्रपणे सांगितले. सैनिकी प्रशिक्षण कसे खडतर असते व त्यामधून सैनिक मानसिक व शारीरिक दृष्ट्या कसा कणखर होतो याबद्दल अतिशय सविस्तर माहिती दिली. सैनिक जगण्यासाठी खात असतो वेळ प्रसंगी कमीत कमी अन्नावर त्याला राहावं लागतं असे सुद्धा त्यांनी सांगितले. प्रशिक्षण झाल्यानंतर सैनिकाचे पोस्टिंग होते व मोहिमा सुरू होतात. श्री. मधुसुदन सुर्वे यांचे सर्वात प्रथम ऑपरेशन 'ऑपरेशन Rhino' होते. त्यानंतर श्री. सुर्वे ऑपरेशन पराक्रम, ऑपरेशन हिफाजत, ऑपरेशन विजय (कारगिल) नंतर ऑपरेशन हिफाजत (२) मणिपूर अशा विविध ऑपरेशनमध्ये सहभागी झाले होते. हिफाजत (२) मणिपूर हे ऑपरेशन त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले यामध्ये त्यांना पायात नऊ व पोटात दोन गोळ्या लागल्या होत्या आठवडाभर ते कोमात होते त्यामधून फिनिक्स पक्षाप्रमाणे उभे राहून अजूनही देशसेवा करत आहे.मोहिमेचे वर्णन श्री सुर्वे यांच्याकडून ऐकताना डोळ्यासमोर चित्र उभे राहते, आपोआप डोळ्यात अश्रू आले. भारत सरकारने त्यांना 'शौर्य चक्र' देऊन गौरवले आहे. लष्करी मोहिमेचे आयोजन नियोजन व प्रत्यक्ष मोहिमेवर पटापट निर्णय घेणे आवश्यक असतात सैनिकांनी कसे नियमानुसार वागायचे असते हे सुद्धा त्यांनी सांगितले. ते सर्व ऐकून सर्व रसिक भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी श्री भगवानराव आडगावकर (कार्याध्यक्ष) यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यकारिणी मंडळाचे सदस्य व विश्वस्त मंडळाचे सदस्य यांचा एकजुटीने कार्यक्रम अतिशय नीटनेटका झाला.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड महिला शाखा स्नेहसंमेलन दिनांक सोमवार २०-१-२०२५ रोजी संस्थेच्या सभागृहात संपन्न झाले. सभागृहाच्या प्रवेशद्वाराशीच येणाऱ्या प्रत्येकीचे हळदीकुंकू व संक्रांती निमित्त तिळगुळ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली.महिला शाखा उपाध्यक्षा सौ उज्वला जोशी यांनी श्री सूक्त पठण केले. प्रास्ताविकात महिला शाखा अध्यक्षा डॉक्टर सौ प्रेरणा क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महिला शाखेचा इतिहास थोडक्यात प्रस्तुत केला. महिला शाखा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्य व सहयोगाने अनेक उपक्रम राबवत असते असे नमूद केले. सौ प्रतिमा जोशी यांनी प्रमुख पाहुण्या मंजिरी देवरस यांचा परिचय करून दिला. डॉ.सौ प्रेरणा क्षीरसागर यांच्या हस्ते त्यांचे श्रीफल व गुलाब देऊन स्वागत करण्यात आले. महिला शाखा स्नेहसंमेलनाचे प्रायोजक श्री विभाकर देवरे (वय वर्ष ८७) पुण्याहून आवर्जून आले होते. विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. श्री विभाकर देवरे यांनी आपली पत्नी कै.सौ.उषा देवरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेला दिलेल्या देणगीतून महिला शाखा वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करते. श्री विभाकर देवरे यांनी महिला शाखा सुंदर आशयघन कार्यक्रम करत असते अशी भावना व्यक्त केली.यावेळी श्री. देवरे यांची भाची व नातही उपस्थित होत्या. मंजिरी देवरस यांचे कथाकथन अतिशय उत्तम रसाळ व मनोरंजनात्मक झाले.त्यांच्या कथनामुळे उपस्थितांच्यात हास्याचे कारंजे उडत होते. कथांची निवड अतिशय छान होती 'पोटाचा प्रश्न' 'बायका व साड्या' या दोन कथा अधिक रंगतदार झाल्या. यानंतर रामायण महाभारत या विषयावर प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.डॉक्टर सौ. प्रेरणाताई क्षीरसागर यांनी वेगवेगळे खेळ घेतले त्यामध्ये सर्व सख्यानी उत्स्फूर्तपणे आणि उत्साहाने सहभागी होत आनंद लुटला. संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण आणि हम चॅरिटेबल ट्रस्ट, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने 'जम्मु-काश्मीर काल....आज आणि उद्या' हा चर्चात्मक संवाद व माहिती पट, तसेच संस्था सदस्य यांचा मकरसंक्रांत व मनोरंजन समारंभ, असा तीन सत्रात कार्यक्रम साजरा करण्यात आला, पहिल्या सत्राची सुरुवात सौ. मुग्धा घाटे सौ. शुभांगी कुलकर्णी व सौ. वृषाली पाठक यांच्या गणेश व सरस्वती वंदनाने झाली.

त्यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात श्री. बसरकोट, सौ. वृषाली वरुडकर, सौ. वैशाली पाठक, सौ. गीताई काळकर, सौ. मंजिरी पसारे यांनी आपल्या सांस्कृतिक कला आपल्या सुरेल आवाजात सादर करून मनोरंजन केले. त्यांस उपस्थितीतांनी भरभरुन प्रोत्साहित केले. दुसऱ्या सत्राला राष्ट्रगीताने सुरुवात झाली, या सत्राचे संचालन श्री. मंदार कुलकर्णी यांनी केले. प्रथम अध्यक्ष श्री. सुरेश कुळकर्णी यांनी प्रास्ताविक करुन देऋब्रा कल्याण संस्थेची व कार्याची माहिती उपस्थितांना दिली. माननीय श्री पित्रे यांनी हम चॅरिटेबल ट्रस्ट, संस्थेची माहिति व कार्याची माहिती थोडक्यात करुन दिली त्यांचा सत्कार संस्था कार्याध्यक्ष श्री दिपक देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर जम्मू काश्मीर स्थित मान्यवर श्री मनोज नशिराबादकर व त्यांच्या पत्नी सौ संगीता नशिराबादकर यांचा परिचय करून देण्यात आला, या उभयतांचा सत्कार शाल व बुके देऊन संस्थेचे कार्यवाह श्री रमेश पालकर व महिला आघाडी प्रमुख सौ. शुभांगी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला, डोंबिवलीचे हम संस्थेचे अध्यक्ष श्री सुनील देशपांडे यांचाही सत्कार सस्था अध्यक्ष श्री सुरेश कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर श्री. मनोज नशिराबादकर यांची मुलाखत सौ संगीता देशपांडे यांनी घेतली, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण संस्थेच्या माध्यमातून रुपये तीस हजारचा धनादेश हम संस्थेचे अध्यक्ष देशपांडे व सर्वेसर्वा संस्थापक श्री मनोज नशिराबादकर यांच्या कडे सुपुर्द केला, आणि संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मुग्धा घाटे यांनी उपस्थित मान्यवर सभासद, हितचिंतक यांचे आभार मानले. त्यानंतर तिसऱ्या सत्राला सुरुवात झाली. त्यात ज्या कलाकारांनी सादरीकरण केले त्यांचे सत्कार करण्यात आले तसेच महिलांना मकर संक्रातीचे वाण देण्यात आले व स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमास कल्याण जनता सहकारी बँक, संचालक श्री पद्मनाभ जोशी, ब्राह्मण सभा अध्यक्ष श्री मुकुंद बापट सर, उपाध्यक्ष व संचालक श्री पंकज दांडेकर, वास्तुविशारद श्री प्रकाश लेले, सामाजिक कार्यकर्ते श्री. विश्वास धारप सपत्नीक तसेच इतर अनेक मान्यवर सभासद हितचिंतक उपस्थित होते.

**मध्यवर्ती मंडळ** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या मालकीच्या कांही खोल्याच्या बाबतीत मा न्यायालयात मध्यवर्ती संस्थेने दावे दाखल केले आहेत. पैकी खोली नंबर १८ तील रहिवाशी (सध्या वास्तव्य ठाणे येथे) श्री योगेश म पेंडसे यांनी मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी, कार्यवाह श्री मिलिंद सरदेशमुख, विश्वस्थ श्री जे के जोशी (डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष) यांच्या उपस्थितीत सदर खोलीचा ताबा स्वखुशीने आज मध्यवर्ती मंडळाकडे सुपूर्द केला. श्री योगेशजी पेंडसे खोलीचा ताबा देतांना अत्यंत भावुक झाले होते. संस्थेने दिलेल्या सहकार्याबद्दल पेंडसे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मध्यवर्ती संस्था करीत असलेल्या सामाजिक कामाबद्दल आपुलकी व्यक्त करीत पेंडसे कुटुंबियांना यापुढे मध्यवर्ती संस्थेच्या विरोधात कोणतीही न्यायालयीन कार्यवाही पुढे चालू ठेवण्यास स्वारस्य नसल्याचे सांगून खोलीचा ताबा दिला.थोर सामाजिक कामात योगेशजी पेंडसे अविरत कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा ब्राह्मण समाजाला व्हावा अशी अपेक्षा श्री प्रभाकर कुलकर्णी आणि श्री जे के जोशी यांनी या प्रसगी व्यक्त केली श्री पेंडसे यांनी तात्काळ दुजोरा दिला. स्वतःहुन खोली नंबर १८ चा ताबा देणारे पेंडसे यांनी भविष्यात कोणताही अधिकार पेंडसे कुटुंबियांचा सदर खोलीच्या बाबतीत राहणार नाही असे लेखी निवेदन आज दिले आहे. मोठया मनाने,स्वखुशीने मध्यवर्ती मंडळाकडे खोलीचा ताबा देणारे पेंडसे कुटुंबियांचे मध्यवर्ती मंडळंच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

**सोलापूर :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था महिला शाखेचा हळदी-कूंकू व तिळगुळ समारंभ संत साहित्यिक, प्राचार्य डॉ. नसीमा पठाण यांचे मार्गदर्शन - मकर संक्रांतीचे औचित्य साधून येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या महिला शाखेच्या वतीने संस्था कार्यालय समर्थ संकुल दत्तचौक येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व महिला शाखेच्या अध्यक्षा कु. हेमाताई चिंचोळकर यांच्या अध्यक्षतेखाली हळदी कूंकू व तिळगुळ समारंभ अतिशय उत्साही वातावरणात पार पडला. तर यावेळी संत

साहित्यिक, प्राचार्य डॉ. नसीमा पठाण यांचे संक्रांती सणांचे महत्व या विषयावर व्याख्यान केले.आपल्या या व्याख्यानात डॉ. नसीमा पठाण यांनी संत साहित्याचा संदर्भ देऊन संक्रांती सणाचे महत्त्व विशद केले. संत रामदास स्वामी यांनी रचलेले मनाचे श्लोक मानवी मनाला मार्गदर्शन करतात. मनाच्या श्लोकाप्रमाणे चांगले बोलावे, चांगले वागावे, बोलताना शब्दांमध्ये गोडवा असावा हेही एक संक्रमण आहे. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी डॉ. पठाण यांनी एक बहारदार कविता सादर केली. डॉ. येळेगावकर यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेमध्ये होणाऱ्या आगामी उपक्रमाची माहिती दिली. महिला शाखेच्या अध्यक्ष कु. हेमाताई चिंचोळकर यांनी सर्व समाजाच्या महिलांसाठी विविध उपक्रम राबवले जातात असे आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रारंभी समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तदनंतर प्रा. सौ. मधुरा वडापुरकर सौ. स्मिता देशपांडे यांच्या गीत गायनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी उपस्थित महिला भगिनींना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्राचार्या डॉ. नसीमा पठाण यांच्या हस्ते हळदी-कूंकू तिळगुळ देवन संक्रांतीचे वाण (भेटवस्तू) देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यवाह डॉ. सौ.नभा काकडे यांनी केले. सौ. क्षितिजा गाताडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन प्रा सौ. शुभदा कुलकर्णी यांनी केले.

**जळगाव** : अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी वर्षपूर्तीनिमित्त देशस्थ ऋग्वेदी ब्रा२ण संघातर्फे नुकताच भाईटे नगरात वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यात व्याख्यात्या क्षितिजा देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. सामूहिक रामरक्षा पठणाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यात क्षितिजा देशपांडे म्हणाल्या, ऋषी वशिष्ठ यांच्याकडे आश्रमात राहून भगवान श्रीरामांनी त्यांच्याकडून अनेक विद्या, शस्त्रास्त्र ज्ञान शिकून घेतले. त्यानंतर जेव्हा श्रीराम आपल्या राज प्रासादात परत आले. आपल्या वडिलांसोबत राजदरबारात राहू लागले असताना विश्वामित्र तेथे आले आणि त्यांनी श्रीरामांची मागणी केली. त्यांच्या आश्रमाच्या सुरक्षेसाठी त्या वेळी श्रीराम त्यांचेबरोबर जाण्यास स्वत: तयार झाले. श्रीरामांच्यात इतका आत्मविश्वास कसा आला. श्रीराम विश्वामित्रांच्या सोबत राक्षसांचा वध करण्यासाठी निघाले. ह्या आत्मविश्वासाचे गुपित कर्तव्यात आहे, असे प्रतिपादनही देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन विशाखा देशमुख यांनी केले. या वेळी विलास देशमुख, उदय खेडकर, दत्तात्रय गंधे, राजेंद्र क्षीरसागर, राजेंद्र कुरंभट्टी, प्रांजली रस्से, अपर्णा गंधे आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्व महिलांना हळदीकूंकू व वाण देण्यात आले.

**धुळे** : महिलांनी मौखिक आरोग्या प्रती जागरूक असावे व वयानुसार दातांची योग्य ती काळजी घ्यावी, दंतरोगांपासून स्वत:ला दूर ठेवत निरोगी आयुष्य जगावे असे आवाहन शहरातील सुपरिचित दंतवैद्य डॉ. कविता महेश नांदेडकर यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ महिला सांस्कृतिक मंडळा तर्फे आयोजित मकरसंक्रातीच्या स्नेहमिलन कार्यक्रमात उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना केले. नवग्रहीतील कै. रामभाऊ गरूड मंगल कार्यालयात महिलांच्या उत्साहात नुकताच मकरसंक्रांत स्नेहमिलन कार्यक्रम संपन्न झाला. दिपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. डॉ. कविता नांदेडकर यांचे स्नेह वस्त्र व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. महिला आघाडी अध्यक्षा सौ. रेणुका ताई पेटारे, श्रीमती जयश्री ताई कुलकर्णी, कार्याध्यक्षा सौ. गितांजली कुळकर्णी व्यासपीठावर उपस्थित होत्या. प्रास्ताविक सौ. रेणुका ताई पेटारे यांनी केले व महिला आघाडीच्या वर्षभरातील उपक्रमांचा आढावा सादर केला. सौ सुषमा पुरोहित यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. सौ. रेवती पागे यांनी सूत्रसंचालन केले, सौ. वैशाली मेहरूणकर, सौ.लिना पांडे यांनी याप्रसंगी सांघिक खेळांचे आयोजन केले. या प्रसंगी उपस्थित महिलांना हळदीकूंकवाच्या सोबत तिळगुळ, मकरसंक्रांत वाणाच्या वस्तुंचे वाटप करण्यात आले. उपस्थित महिलांनी सांघिक खेळात सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घेतला, याप्रसंगी महिलांची चांगली उपस्थिती होती. कार्यक्रमात सेल्फी पॉईटची

सोय असल्याने महिलांनी सेल्फीचा आनंद घेतला अल्पोपहार व चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्र व समाज उभारणीत उद्योजकांचे महत्त्वाचे स्थान असून देशाच्या प्रगतीसाठी उद्योजकांनी नवीन तंत्रज्ञानाची देखील कास धरावी, असा सूर ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क ग्लोबलतर्फे रविवारी ०२/०२/२०२५ आयोजित परिषदेत निघाला. परिषदेत उद्यम कौस्तुभ आणि जीवनगौरव या पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावर्षी मिलिंद व मोहिनी केळकर, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्थाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर उद्यम कौस्तुभ पुरस्कार आरती सुभेदार, नितीन ढेपे, अरविंद पहुरकर, नीलेश दीक्षित, सुमित तिवारी, जोत्स्ना गोडबोले यांना देण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती तसेच गोव्याचे माजी लोकायुक्त श्री. अंबादास जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ब्राह्मण समाजाची देशातील सर्वात मोठी सामाजिक संस्था ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क ग्लोबलतर्फे (बीबीएनजी) ९वी आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषद 'परिवर्तन' रविवारी०२/०२/२०२५ एमजीएम संस्थेच्या रूक्मिणी सभागृहात पार पडली. उद्घाटक म्हणून सुप्रिया बडवे या उपस्थित होत्या. 'बीबीएनजी'चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, डॉ. विजय जोशी (सिडनी, ऑस्ट्रेलिया), ज्येष्ठ उद्योजक राम भोगले, विवेक देशपांडे, मुकूंद कुलकर्णी, मुनीश शर्मा, हेरंब कुलकर्णी, शेफाली निधोजकर - भुजबळ, सुशील कुलकर्णी, प्रदीप पेशकार, डॉ. उदय निरगुडकर, ओंकार दाभाडकर, प्रथमेश सखदेव, श्रीपाद देशमुख, अरविंद कोरालकर, सुयोग नरवणे, महेश देशपांडे, डॉ. अजय शेष आदींची उपस्थिती होती. परिषदेत एज्युकेशन, इन्फ्रा स्ट-क्चर, शासकीय योजना व आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. परिषद यशस्वी होण्यासाठी 'बीबीएनजी'चे सहयोगी संचालक डॉ. अभिजित चांदे, परिषदेचे कप्तान शैलेश देशपांडे, उपकप्तान गीता आचार्य आणि संयोजन समितीने परिश्रम घेतले.

**बेळगाव :** बेळगाव येथील समर्थ अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीला उत्कृष्ट सहकारी सोसायटी म्हणून




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH
B.COM. CAIIB DBM
Insurance & Investment Consultant
LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund
M. : 9930445721 / 9702837022
Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance Specialist

गौरविण्यात आले. बुधवारी जेएनएमसीच्या सभागृहात झालेल्या ७१ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहाच्या सांगता समारंभात समर्थ सोसायटीचे चेअरमन ॲड. अजय सुनाळकर व व्हाईस चेअरमन अभय जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि फळाची करंडी देऊन त्यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी सोसायटीचे संचालक विनायक जोशी, अरविंद कुलकर्णी, सुनंदा आळतेकर, छाया जोशी, मालतेश पाटील, प्रदीपकुमार कुलकर्णी, गणपतराव कुलकर्णी, अनिल भंडारी, उमेश सुणगार व परशुराम कांबळे यांच्यासह सेक्रेटरी राघवेंद्र केसनूर उपस्थित होते. सोसायटीचे मुख्य कार्यालय समर्थ भवन, मारूती गल्ली, बेळगाव येथे असून संस्थेच्या शाखा शहापूर, टिळकवाडी, राणी चन्नम्मानगर व खानापूर येथे कार्यरत आहेत. संस्थेने गेल्या काही वर्षात उल्लेखनीय प्रगती केली असून शहरातील प्रतिष्ठित संस्था म्हणून समर्थ सोसायटीकडे पाहिले जाते. यापूर्वी समर्थ सोसायटीला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# आरोग्यवेध

**डॉ. नीरज रायते (मो. : ९९२२४२७०६७)**

आपण आजारी पडलो की डॉक्टरांकडे जातो. डॉक्टर, मग आपल्याला काय त्रास होतो, याची चौकशी करतात. अनेकवेळा अनेक आडवे तिडवे प्रश्न विचारतात. कधी कधी आपल्या घरच्या मंडळीबद्दल चौकशी करतात..... अगदी भंडावून सोडतात. काय झालं? कसं झालं? केव्हापासून त्रास होतोय? असंच पूर्वी कधी झालं होतं काय? हा त्रास व्हायला लागला त्यावेळची परिस्थिती कशी होती? त्यावेळेपेक्षा आता त्रास कमी झालाय की अधिक आहे? काय केल्यानं आराम वाटतो? कशानं त्रास वाढतो? असे एक ना अनेक प्रश्न विचारुन आजाराच्या लक्षणांचा साकल्यानं विचार केला जातो. लहानपणी काही विशिष्ट आजार होते का? औषधोपचार चालू आहेत का? सध्या कुठली औषधे घेत आहात? घरात अशीच लक्षणे दुसऱ्या कोणा व्यक्तीमध्ये दिसतात का? रुग्णाला काही वाईट सवयी, व्यसने आहेत का? आहार काय घेता? असे अवघड प्रश्न डॉक्टर विचारतात. एवढंच नाही तर तुमचा व्यवसाय, तुमचं राहण्याचं ठिकाण, तुमची आर्थिक स्थिती, तुम्ही करीत असलेल्या कामाचं स्वरुप, अशा अनेक गोष्टींचा रोगनिदान करण्यासाठी उपयोग होतो.

मित्रांनो, या मूलभूत आणि समग्र चौकशीनंतर तुम्हाला होत असलेल्या आजाराचं प्राथमिक अनुमान काढलं जातं. आम्ही डॉक्टर मंडळी अधिक सखोल तपासणी करुन त्या आजाराची विशिष्ट चिन्हे शोधतो आणि मग आपल्या आजाराचं प्राथमिक निदान होतं. आम्ही त्याला 'प्रोव्हिजनल डायाग्नोसिस' असं म्हणतो. लक्षणांचा परिपूर्ण अभ्यास करणं याला आधुनिक वैद्यकशास्त्रामध्ये फार महत्त्व दिलं जातं. किंबहुना 'मायग्रेन', 'एपिलेप्सी' 'अंजायना पेक्टोरिस' 'ब्रॉन्किअल, अस्थमा' या व्याधींचे निदान केवळ लक्षणांच्या अभ्यासाने आणि विश्लेषणाने होऊ शकते. लक्षणे, शारीरिक तपासणी आणि प्रयोगशालेय चाचण्या घेऊन 'डायग्नोसिस' निश्चित केल्यावरच सुयोग्य उपचार होऊ शकतात. (Without proper diagnosis, there is no proper treatment) विदाऊट प्रॉपर डायग्नोसिस, देअर इज नो प्रॉपर ट्रीटमेंट' हे वैद्यकशास्त्राचं महत्त्वाचं सूत्र आहे. डॉक्टरांच्या प्रशिक्षणात त्यावर विलक्षण भर दिलेला असतो..

मित्रांनो, आपले डॉक्टर रोगनिदानासाठी एक प्रकारे पोलीस इन्स्पेक्टरसारखंच काम करीत असतात. गुन्हा घडण्याचे कारण, परिस्थितीचं सर्वेक्षण, पुराव्याची गोळाबेरीज, कार्यकारण संबंध, संशयित आरोपीची चौकशी अशा अनेक बाबींतून जसा गुन्हा सिद्ध होतो तसंच लक्षणे, चिन्हे, प्रयोगशालेय चाचण्या, कारणमीमांसा करुन

डॉक्टर अंतिम निष्कर्ष काढतात. म्हणूनच योग्य रोगनिदान करण्यासाठी रुग्णांनी दिलेली माहिती अचूक असायला हवी. त्यात काहीही लपवून ठेवणे अपेक्षित नाही. डॉक्टर आणि परमेश्वर यांच्यापासून काहीही लपवून ठेवणं योग्य नाही, असं म्हणतात. शेवटी आपण उपचार माणसांच्या तक्रारींचे करतो फक्त रिपोर्ट बघून नाही.

बऱ्याचवेळा रुग्णाची स्थिती गंभीर असते. तो भानावर नसतो. अशावेळी आवश्यक माहिती रुग्णाच्या नातेवाईकांकडून किंवा प्रत्यक्ष घटना पाहणाऱ्यांकडून मिळवावी लागते. यासाठी डॉक्टर देखील कार्यकुशल, अनुभवी असावे लागतात.

अनेक आजारात लक्षणे आणि चिन्हें सारखीच असतात. अशावेळी चिकित्सक वृत्तीने सर्वच परिस्थितीचे विश्लेषण करणे आवश्यक असते आणि कधी कधी तर सर्व आजारांचा, लक्षणांचा प्रयोगशालेय चाचण्यांचा अभ्यास करुनही रोगनिदान होतेच असेही नाही. डॉक्टर हा सुद्धा एक माणूसच आहे आणि त्याच्या प्रयत्नांना देखील मर्यादा असतात. मानवी शरीर ही जादूची पेटी आहे. प्रकृतीचं गणितच वेगळं! तिथं २+२ म्हणजे ४ असं घडतंच असं नाही, तर कधी ४ ऐवजी ५ किंवा कधी ३ असेही होते. म्हणूनच मृत्यूचं गूढ कधी कधी अनुत्तरित राहाते, हे लक्षात घ्यायला हवे!

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ..........................................................................................................

*** आशिष मधुकर दिक्षित (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २३/११/१९८८, **जन्म वेळ :** रात्री २.१२, **जन्म ठिकाण:** नाशिक, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (-), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **चरण :** १, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, शिक्षण **:** एम एस सी (केमिस्ट्री), **नोकरी/ व्यवसाय :** मेगाफाइन फार्मा नाशिक, **वार्षिक उत्पन्न :** ६.१५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९४२२७४६१३४/९४०३९०२२१०

*** पराग हेमंत प्रसादे (देशस्थ ऋग्वेदी ), जन्म तारीख :** ०७/११/१९८८, **जन्म वेळ :** दुपारी ४.२०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.३, **गोत्र :** कौशिक, **रास :** कन्या, **नक्षत्र :** चित्रा, **चरण :** २, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.ई. कॉम्प्युटर, **नोकरी/ व्यवसाय :** बिजनेस इन इ - कॉमर्स, **वार्षिक उत्पन्न :** ६ते७लाख, **अपेक्षा :** समकक्ष, अनुरूप, **संपर्क :** ८४४६९०९८५८/९८९२३४५१६५

*** स्वप्निल विजय आठवले (कोकणस्थ), जन्म तारीख :** २७/०५/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी १.००, **जन्म ठिकाण:** कल्याण, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण:** बी.इ. (एक्स-टेलिकोम्युनिकेशन), **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी घणसोली, **वार्षिक उत्पन्न :** १० ते १२ लाख, **अपेक्षा:** कोकणस्थ /देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण, वयातील अंतर १ ते ५, शुद्ध शाकाहारी, सुशिक्षित, अनुरूप, नोकरी/व्यवसाय आवश्यक (सिंह रास नको), **संपर्क :** ९०२९७३८२८/९९६९९१५१०३८

*** प्रथमेश मिलिंद निरखे (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख :** २६/१०/१९९२, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.०६, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कात्यानी, **रास :** तूळ, **नक्षत्र :** स्वाती, **चरण:** ४, **नाडी:** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी.कॉम, एल एल बी, डिप्लोमा इन साइबर लॉ , **नोकरी/ व्यवसाय:** स्वत:चा व्यवसाय, वार्षिक उत्पन्न : ४लाख २०हजार, **अपेक्षा :** ब्राह्मण, शाकाहारी, वकीली पदवीधर/पदव्युत्तर (लीगल फील्ड), **संपर्क:** ९८१९३३२८२३

*** स्वप्निल प्रकाश रानडे (कोकणस्थ ब्राम्हण), जन्म तारीख :** ११/०१/१९९७, **जन्म वेळ :** पहाटे ३.३६, **जन्म ठिकाण:** कल्याण, **उंची :** ५.६, **गोत्र :** भारव्दाज, **रास :मकर, नक्षत्र** : श्रवण, **चरण :** ४, **नाडी :** अंत्य, **गण:** देव, **शिक्षण :** बी.ए. पास, **नोकरी/ व्यवसाय :** बी. एम. सी सायन हॉस्पिटल मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** २ लाख ४०हजार, **अपेक्षा:** सर्व शाखांतील चालतील, १२वी/पदविधर, नोकरी असल्यास उत्तम नसेल तरी करण्याची तयारी, गृहकृतदक्ष, **संपर्क:** ९३२१६६०३४०/९७६९५८०३१८

*** ऋषिकेश शरद पत्की (गौड सारस्वत ब्रा२ण), जन्म तारीख :** २४/०२/१९९४, **जन्म वेळ :** रात्री ८.३५, **जन्म ठिकाण:** मुंबई, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौंडिण्य, **रास :** कर्क, **नक्षत्र** : अश्लेषा, **चरण:** २, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** सीए(चार्टर्ड अकाउंटेंट), **नोकरी/ व्यवसाय :** ऑडिटर मॅनेजर, **वार्षिक उत्पन्न :** १५लाख, **अपेक्षा:** अनुरूप, सुशिक्षित, सुसंस्कृत, **संपर्क :** ९८३३६२२०७०
*** चिन्मय गजानन कोनकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** १७/०६/१९९८, **जन्म वेळ :** रात्री ११.४७, **जन्म ठिकाण:** नागोठणे, **उंची :** ५.७, **गोत्र :** शालाक्ष, **रास :** मीन, **नक्षत्र** : उत्तरा भाद्रपदा, **चरण :** २, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.इ. (इ अन्ड टी सी), **नोकरी/ व्यवसाय : टी सी एक. सी बी डी बेलापूर, वार्षिक उत्पन्न :** ७लाख, **अपेक्षा:** मनमिळाऊ, पदवीधर, नोकरी करणारी, **संपर्क :** ८६०५९८९७४९/८१४९६३१९९७
*** प्रणव श्रीकांत केळकर (कोकणस्थ), जन्म तारीख :** २८/०७/१९९८, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.१०, **जन्म ठिकाण:** डोंबिवली, **उंची :** ५.२, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** कन्या, **नक्षत्र** : उत्तरा, **चरण:** ४, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम.कॉम. जी डी सी ए, **नोकरी/ व्यवसाय :** सहकारी बँक(सोलापूर), **वार्षिक उत्पन्न :** १लाख अडसष्ट हजार, **अपेक्षा :** नोकरी करणारी आणि घर सांभाळणारी, **संपर्क :** ९०८२४७८८३५/८३५६००५५३२
*** संकेत संजय वाशीकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०१/०४/१९८७, **जन्म वेळ :** सकाळी १.००, **जन्म ठिकाण:** मुंबई, **उंची :** ५.८, **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** मेष, **नक्षत्र** : भरणी, **चरण :** १, **नाडी :** मध्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** बीए(फिलॉसॉफी), एम बी ए (यात्रा पर्यटन), योग थेरपिस्ट, **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:ची ट्रॅव्हल एजन्सी, **वार्षिक उत्पन्न :** ८.५लाख, **अपेक्षा :** पदवीधर असावी, नोकरी असावी, एखाद्या कलेची आवड असावी, **संपर्क :** ९८६९२३०७०७

**वर पाहिजे** ......................................................................................................

*** सोनिया संजय जोशी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** १८/०४/१९८९, **जन्म वेळ :** दुपारी ४.१०, **जन्म ठिकाण:** डोंबिवली, **उंची :** ४.११, कॉन्टॅक्ट लेन्स आहे, **गोत्र :** काश्यप, **रास :** कन्या, **नाडी :** आद्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण:** बी.कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** निम्म सरकारी, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** कायम नोकरी असावी, **संपर्क :** ९७५७१५४४४६
*** उर्त्कषा विश्वास देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २४/११/१९९०, **जन्म वेळ :** दुपारी २.१०, **जन्म ठिकाण:** अहमदनगर, **उंची :** ५.३, **रक्तगट :** बी (-), **गोत्र :** कौशिक, **रास :** मकर, **नक्षत्र :** धनिष्ठा, **चरण:** १, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.एस.सी होम सायंन्स, एम एस सी एक्सटेंशन एज्युकेशन बी एड, **नोकरी/ व्यवसाय :** हायस्कूल शिक्षिका(डोंबिवली), वार्षिक उत्पन्न : १. ५लाख, **अपेक्षा :** उच्च शिक्षित, **संपर्क :** ९९६९०००१२४/ ९८६९३७९४
*** श्रुती श्रीपाद देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २७/११/१९९३, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.३५, **जन्म ठिकाण:** खोपोली (रायगड), **उंची :** ५.४, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **चरण :** ३, **नाडी:** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम एस सी बॉटनी, बी एड, ग्राफीक डिजायनर, **नोकरी/ व्यवसाय :** वडीलांच्या व्यवसायात मदत करते, वार्षिक उत्पन्न : १.८ लाख, **अपेक्षा :** किमान पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण जातीचा, **संपर्क:** ८८०५९५८३६९
*** मधुरा दुर्गाप्रसाद आकांत (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख :** २६/०७/१९९९, **जन्म वेळ :** दुपारी ३.३६, **जन्म ठिकाण:** अमरावती, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** पुतीमाश, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वा षाढा, **चरण:** २, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एमटेक कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट, जर्मन लँग्वेज, **नोकरी/ व्यवसाय:** खाजगी(मुलुंड), **वार्षिक उत्पन्न:** ५ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, सी ए, किंवा एम टेक, **संपर्क :** ९८१९२९५८५७
*** मनाली माधव गोडबोले (चित्पावन), जन्म तारीख :** २९/०८/२०००, **जन्म वेळ :** सायंकाळी ४.५९, **जन्म ठिकाण:** माणगाव, **उंची :** ५.७, **रक्तगट :** बी (-), **गोत्र :** कौशिक, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा, **चरण :** ४, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एफ.व्हाय.बीए, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न : २ लाख, अपेक्षा :** उंची ६ फुट पाहिजे, स्वत:चे घर, सुस्थीत, वयातील अंतर ३ ते ४, समजुतदार **संपर्क:** ९८९२६५५७२४

# श्री यश टूर्स

सेंट्रल रेल्वे हौसींग सोसायटी,
प्लॉट नं. ४१, कल्याण रोड,
डोंबिवली ( पूर्व ) ४२१२०१.

आयोजक : श्रीकांत पाटसकर मोबा. : 9819148002

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | | |
|---|---|---|
| इंदोर, उज्जैन, मांडू<br>ओंकारेश्वर व महेश्वर | फेब्रुवारी २७<br>खर्च प्र. रु. १८,००० + रेल्वे/बस | ३ रात्र |
| मदुराई, तंजावर, रामेश्वर<br>कन्याकुमारी व त्रिवेंद्रम | मार्च १५<br>खर्च प्र. रु. २८,००० + विमान | ५ रात्र |
| काशी, प्रयाग, अयोध्या | मार्च २४<br>खर्च प्र. रु. २२,००० + विमान | ४ रात्र |
| भुवनेश्वर, जगन्नाथ पुरी, कोणार्क | एप्रिल ०१<br>खर्च प्र. रु. २२,००० + रेल्वे/विमान | ४ रात्र |
| काश्मीर, वैष्णोदेवी, श्रीनगर, सोनमर्ग,<br>गुलमर्ग, पहलगाम. | एप्रिल १३<br>खर्च प्र. रु. ३३,००० + रेल्वे/विमान | ७ रात्र |
| काश्मीर, कारगील | एप्रिल २०<br>खर्च प्र. रु. ३५,००० + विमान | ७ रात्र |
| कारगील, लेह - लडाख | मे ९, १६<br>खर्च प्र. रु. ४२,००० + विमान | ७ रात्र |
| हिमालयातील २ धाम - केदारनाथ,<br>बद्रीनाथ, हरीद्वार, हृषिकेश सह | जून १०, २०<br>खर्च प्र. रु. ४०,००० + विमान | ८ रात्र |

सुचना : - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing) ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व भोजन ( दोन वेळचं ), स्थळदर्शन व मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.

※ **गायत्री जयंत डकारे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २५/०७/२००२, **जन्म वेळ :** दुपारी ४.००, **जन्म ठिकाण :** बऱ्हाणपुर(मध्यप्रदेश), **उंची :** ५.९, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **चरण :** ४, **नाडी:** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** नाही, शोधात, **अपेक्षा :** शाकाहारी, मनमिळाऊ, स्वत:चे घर हवे, मुंबई परिसरातील, वयातील अंतर २ते३, मुलाचे मासिक उत्पन्न ४० हजार हवे (मुलीला आई वडील नाही मुलगी मामाकडे राहते), **संपर्क :** ९६१९२६४६२१/८२६९८०९९८७

※ **भारती राघवेंद्र मिर्जी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०१/०२/१९९९, **जन्म वेळ :** सकाळी ७.००, **जन्म ठिकाण:** बदलापूर, **उंची :** ५.२, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** अगस्ती, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **चरण:** २, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम. ए. सायकॉलॉजी, **नोकरी/ व्यवसाय :समुपदेशक,** वार्षिक उत्पन्न : १.४ ते १.५लाख, **अपेक्षा :** निर्व्यसनी, शाकाहारी, अनुरूप, व्दि पदवीधर, शक्यतो मुंबई, ठाणे कल्याण, डोंबिवली, बदलापूर परीसरातील प्राधान्य, वयातील अंतर १ ते ५ वर्ष, **संपर्क :** ८८७९८९८१९७/९२२२२२५०१६

※ **पूजा चंद्रशेखर कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०८/०३/२०००, **जन्म वेळ :** सकाळी ७.४०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.५,गोत्र : काश्यप, **रास :** मीन, **नक्षत्र :** रेवती, **चरण :** १, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी.ए (राज्यशास्त्र), **नोकरी/ व्यवसाय :** हायस्कूल शिक्षिका(डोंबिवली), **वार्षिक उत्पन्न:** १. ५लाख, **अपेक्षा:** अनुरूप, सुस्वभावी, समजुन घेणारा, निर्व्यसनी, एकत्र कुटुंब चालेल, **संपर्क :** ९९६९०००१२४/९८६९३७९४

※ **दिव्या अरूण पेठकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** १९/०५/२००१, **जन्म वेळ :** सकाळी १०.१०, **जन्म ठिकाण:** कल्याण, **उंची :** ५.७, **गोत्र :** कौशिक, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तराभाद्रपदा, **चरण :** ४, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** पदवीधर बी. एम. एम. मास मिडीया, **नोकरी/ व्यवसाय :** लोकशाही चॅनल, **वार्षिक उत्पन्न :** अंदाजे ४लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७५०६१६३६८०/९७६९४४५३७२

※ **पल्लवी संजय वळसंगकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २९/०४/१९८८, **जन्म वेळ :** सकाळी २.२५, **जन्म ठिकाण :** चेबूंर (मुंबई), **उंची :** ५, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** मुद्गल, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तरा, **चरण :** ४, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** M.Sc in Business Analytics (UK), BE in instrumentation, **नोकरी/ व्यवसाय :** सध्या पार्ट टाईम जॉब यूके मधे करत आहे, **अपेक्षा :** अनुरूप, उच्चशिक्षित, **संपर्क :** ९८६७५०३३६८

**(घटस्फोटित / पुर्नविवाह)**

**वर पाहिजे** ................................................................................................

※ **प्राजक्ता संदिप भट्ट (देशस्थ यर्जुवदी) (घटस्फोटित), जन्म तारीख :** १४/०९/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.३०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.४, **गोत्र :** चंद्रायन, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **चरण :** ३, **नाडी:** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी.कॉम मॅनेजमेंट स्टडीस्, **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:चे ब्युटीपार्लर, **वार्षिक उत्पन्न :** १.४लाख, **अपेक्षा:** मनमिळावू, स्वत:चे घर, कायम नोकरी, उंची ५.६च्या वर, **संपर्क :** ९०८२६२०५७०

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**

## श्रद्धांजली



संवेदनशील क्रीडा समीक्षक,एक प्रतिभावान लेखक द्वारकानाथ संझगिरी ६ फेब्रुवारी २०२५ रोजी निधन झाले. द्वारकानाथ संझगिरी यांना दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्यिक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखन पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार क्रीडा विषयक लेखनासाठी विश्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले. द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.




# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली
सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

– तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्ययावत सोयीयुक्त सभागृह

– दुसऱ्या मजल्यावरील अद्ययावत सोयीयुक्त सभागृह.

### ✻ वैशिष्ट्ये ✻

वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन
मंगल कार्य ठरतात प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.
सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम,
संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध

✻✻✻✻

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.
दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadram@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


..... महा कुंभमेळ्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा .....
SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
SAMARTH URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BELGAUM ESTD : 1996
HEAD OFFICE: Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. Ph.: 2431357
RC Nagar Branch: Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161
Tilakwadi Branch: Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357
Shahapur Branch: 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Ph.: 2431257
Khanapur Branch: 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655
BEST SOCIETY AWARD WINNER
from Govt. of Karnataka
चेअरमन
व्हा. चेअरमन
....... संचालक मंडळ .......
ॲड. अजय ए. सुनाळकर
अभय व्ही. जोशी
गणपत ए. कुलकर्णी
विनायक जी. जोशी
प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी
मालतेश जी. पाटील
सुनंदा सी. आळतेकर
छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी
उमेश सुणगार
परशुराम एम. कांबळे
अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर
सेक्रेटरी
गौरी एस. बिडी
जन. मॅनेजर
सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.



**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ कार्यालयात २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा. मा.कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांचे शुभ हस्ते झेंडावंदन**

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH